# PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com


PARLE MAHOTSAV

दिनांक 24.12.2015

कृपया प्रसिद्धीसाठी

## सक्षम व्यक्तिमत्व घडवण्यासाठी पार्ले महोत्सवात भाग घ्यावा
## कला दिग्दर्शक नितिन देसाई यांचे आवाहन

मुंबई दि २४ : "आपल्याला अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले असले तरी बालपणी चित्रकला स्पर्धांमधून मिळालेल्या बक्षिसांचे माझी कारकीर्द घडण्यात महत्त्वाचे स्थान आहे," असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितिन देसाई यांनी केले. साठ्ये महाविद्यालयात होणाऱ्या १६ व्या पार्ले महोत्सवामधील कला स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अशा स्पर्धांमधून केवळ कलावंत किंवा खेळाडू घडत नसतो तर सक्षम व्यक्ती घडत असतात. आयुष्यामधील रोजच्या स्पर्धांना सामोरे जाण्याची ताकद स्पर्धांमध्ये मिळत असते. त्यामुळे सक्षम व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी आमदार पराग अळवणी यांनी आयोजित केलेल्या पार्ले महोत्सवासारख्या उपक्रमांचा लाभ सर्वांनी घेतला पाहिजे, असेही ते म्हणाले. तर पार्ले महोत्सव हा समाजासाठी होणारा एक उत्तम उपक्रम असल्यामुळे आम्हाला महोत्सवासोबत जोडण्यात सदैव आनंद असतो, अशा भावना साठ्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य माधव राजवाडे यांनी व्यक्त केल्या.

महोत्सवातील स्वरचित काव्य वाचन स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना कोमसापच्या विश्वस्त रेखा नार्वेकर यांनी, पार्ले महोत्सव हा कला, क्रीडा व साहित्य याचा त्रिवेणी संगम आहे असे कौतुकोद्गार काढले तर सुप्रसिद्ध कवी सतीश सोळांपुरकर यांनी एक कविता कशी रचली जाते व कशी सादर केली जाते यावर मार्गदर्शन केले.

महोत्सवातील बुद्धिबळ, बॅडमिंटन, कॅरम, टेबल टेनिस व रायफल शूटींग अशा इनडोअर खेळांचे उद्घाटन राष्ट्रीय स्पर्धांमधील अनेक सुवर्णपदक विजेत्या, समालोचक व अभिनेत्या निर्मला कोटनीस यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बोलताना, पार्ले महोत्सवासारख्या भव्य उपक्रमांमुळे खेळाकडे पुढील पिढी आकर्षित होतील, असा विश्वास व्यक्त केला.

महोत्सवातील पहिल्या पाच दिवसांत ५० मीटर धावणे, गोळा फेक, स्लो सायकलिंग, बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कॅरम, रायफल शूटिंग, कविता वाचन, चित्रकला व ज्येष्ठ नागरिकांसाठी वन मिनीट गेम्स, तसेच खो खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, रस्सी खेच व टेली मॅचेस इत्यादी १४ स्पर्धांमधून आत्तापर्यंत १५ हजार स्पर्धकांनी सहभाग घेतला असल्याची माहिती प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी यांनी दिली.

---

सदर प्रसिद्धीपत्रक गुरुचरण सिंह संधू, अध्यक्ष, आयोजन समिती यांनी प्रसिद्ध केले आहे.